Beed | DAILY | MARATHI | Year-03 | Issue -315 | FRIDAY DT.16 FEBRUARY 2024 | RNI-MAHMAR/2021/80074 | PRICE - 3 RUPEES | PAGES - 4

बीड | दैनिक | मराठी | वर्ष -०३ | अंक -३१५ | शुक्रवार,दि.१६ फेब्रुवारी २०२४ | आरएनआय -एमएएचएमएआर/२०२१/८००७४ | । किंमत ३ रू | । पाने ४

दैनिक • महाराष्ट्राचा बुलंद आवाज | बीड | छत्रपती संभाजीनगर | जालना | लातूर | परभणी | धाराशिव | हिंगोली | नांदेड | नगर

मराठवाडा पत्र

संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे

बीड • dailymarathwadapatra2021@gmail.com • https://marathwadapatra.com • https://epaper.marathwadapatra.com • Mo. 9822152955

राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवारांचीच

विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकरांनी केले शिक्कामोर्तब

मुंबई : राष्ट्रवादी काँग्रेस आमदार अपात्रता प्रकरणात विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी गुरुवारी निकाल देताना राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवारांची यावर शिक्कामोर्तब केले आहे. काही दिवसांपूर्वी केंद्रीय निवडणूक आयोगाने राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष आणि चिन्ह अजित पवारांचे असल्याचा निर्णय दिला होता. त्यानुसारच नार्वेकरांनी निर्णय दिला आहे. तसेच अजित पवारांचे आमदार अपात्र नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले आहे.

विधिमंडळात असलेले बहुमत याच्या आधारे निवडणूक आयोगाने राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवारांची असल्याचा निर्णय घेतला होता. त्यामुळे नार्वेकर देखील याचा आधार घेण्याची शक्यता होती. त्यानुसार नार्वेकरांनी विधिमंडळातील संख्याबळ आणि केंद्रीय निवडणूक आयोगाच्या निर्णयाचा संदर्भ घेत राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवारांची असा निकाल दिला आहे.

राहुल नार्वेकर यावेळी निकाल देताना म्हणाले की, ३० जून २०२३ रोजी राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये दोन गट पडले. दोन्ही गटांनी मूळ राष्ट्रवादी आपली असल्याचा दावा केला. राष्ट्रवादी काँग्रेसच्या घटनेबाबत कोणताही वाद नाही. दोन्ही गटांना म्हणणे मांडण्याची संधी दिली. ३० जून रोजी ४१ आमदारांनी अजित पवारांना अध्यक्ष मानले. निकाल देताना संख्याबळ लक्षात घेतले. सचिवालयातील कागदपत्रांचाही निर्णय घेताना विचार करण्यात आला.

पक्ष घटना, नेतेपदाची रचना, विधिमंडळाच्या बहुमतावर पक्ष ठरवण्यात आला आहे. ३० जून नुसार अजित पवार यांना अध्यक्ष म्हणून निवड केली. अजित पवार हे अध्यक्ष होतात. तरी अजित पवारांची निवडणूक ही पक्षाच्या घटनेनुसार झालेली नाही, असे नार्वेकर म्हणाले. २९ जूनपर्यंत कोणीही शरद पवारांच्या अध्यक्ष पदाला आक्षेप घेतला नव्हता. ३० जून रोजी शरद पवार पार्टी अध्यक्ष आहेत आणि अजित पवार अध्यक्ष असे दोन क्लेम करण्यात आले. दोन्ही पार्टीने राष्ट्रवादी घटनेनुसार अध्यक्ष निवडले गेले आहेत असा दावा करण्यात आला.

राहुल नार्वेकर यांनी सुरुवातीपासूनच राष्ट्रवादी काँग्रेसकडे अजित पवार यांच्याकडे जाणार असे संकेत दिले होते. विधिमंडळात बहुमत कुणाचे हा एकमेव निकष ग्रहित धरणे शक्य आहे. अजित पवारांना ४१ आमदारांचा पाठिंबा आहे. तसेच नागालँडमधील आमदारांनाही त्यांना पाठिंबा दिला आहे. शरद पवार गटाने बहुमत असल्याचा दावा केलेला नाही, असे नार्वेकर म्हणाले. नवनवीन पक्षांसोबत व विचारसरणी सोबत हल्ली युती व आघाडी होताना आपण पाहत आहोत.

आष्टीतील अल्पवयीन मुलीवर अहमदनगरमध्ये अत्याचार

भावकीतील तरूणाविरोधात गुन्हा

आष्टी-येथील एक अल्पवयीन मुलीस घरी येऊन दुचाकीवर घेऊन अहमदनगर जिल्ह्यातील एका हॉटेलवर नेत भावकीतील तरूणानेच अत्याचार केल्याची घटना समोर आली आहे. याप्रकरणी आष्टी पोलिस ठाण्यात एकावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

आष्टी पोलिस ठाणे हद्दीतील एका गावातील १५ वर्षीय मुलीला तिच्या भावकीतील तरूणाने ११ फेब्रुवारी रोजी घरी येऊन दुचाकीवर बसवून अहमदनगर जिल्ह्यातील एका हॉटेलवर नेले. विश्वासातील तरूण असल्याने मुलगी देखील गेली. पण नंतर हॉटेलमध्ये गेल्यावर त्याने बळजबरीने अत्याचार केल्याची घटना घडली. त्यानंतर मुलीला परत घरी आणून सोडले. मुलगी घाबरून शांत राहिली.त्रास असह्य झाल्याने बुधवारी मुलगी रडत असल्याने आईने विचारणा केली. यावेळी मुलीने घडलेला प्रसंग कथन केला. त्यानंतर आईवडिलांसह पोलिस ठाण्यात येऊन पिडीत मुलीने तक्रार दाखल केली. यावरून आष्टी पोलिस ठाण्यात ३६३,३७६, बाललैगिक अत्याचार यासह विविध कलमानुसार गुन्हा दाखल केला करण्यात आला आहे. पुढील तपास पिंक पथक प्रमुख सहायक पोलीस निरीक्षक धरनीधर कोळेकर करीत आहेत. आरोपीचा शोध सुरू आहे.

अंतरवाली सराटी येथे मोठा जनसमुदाय उपस्थित

सहाव्या दिवशी जरांगे उपोषणावर ठाम , तब्येत खालावली

वडीगोद्री : अंतरवाली सरटी येथे कायद्याची अंमलबजावणी करावी ,गुन्हे वापस घ्या आदी मागणी साठी शनिवार ता.१० पासून मनोज जरांगे हे आमरण उपोषण करत आहे जरांगे यांचा आज गुरुवार ता.१५ रोजी सहावा दिवस असुन त्यांनी अन्न, पाणी,व वैघकिय उपचार घेण्यासाठी आजही नकार दिला आहे त्याची तब्येत खालावली असल्याने सरकारचे टेन्शन वाढले आहे.

त्यांना उठता, बसता येत नाही , पोटात दुखत आहे, काल नाकातुन रक्तस्त्राव झाला होता तरही ते उपोषणावर ठाम आहेत. उपोषणाच्या ६ व्या दिवशी अंतरवाली सराटी येथे मोठा जनसमुदाय उपस्थित होता, या ठिकाणी नारायण गडाचे मंहत शिवाजी महाराज , बंकट स्वामी संस्थान नेकनूर येथील मंहत आदी हे दुपारी अंतरवाली सरटी येथे आले आसता त्यांनी व उपस्थित महीला ,नागरीक यांनी जरांगे यांना पाणी घेण्यासाठी आग्रह केला

कार्यकारी अभियंत्याला दहा हजाराची लाच मागणारा लिपीक पकडला

बीड : साहेबांचा साहेब म्हणजे लिपीक आणि सेवक अशीच काहीशी गडबड सध्या होताना दिसत आहे. कारण साहेबांना भेटायचे म्हटल्यावर खालच्या सेवक आणि लिपीकाला काही तरी चहापाणी केल्याशिवाय वरती पोहचता येत नाही. तशीच काहीशी गत आज घडली आहे. चक्क कार्यकारी अभियंत्याचे पगार बिल काढण्यासाठी लिपीकाने साहेबांना दहा हजार रूपयांची लाच मागीतल्याप्रकरणी रंगेहात पकडले आहे.

छत्रपती संभाजी नगर येथील प्रधानमंत्री ग्राम सडक योजना या कार्यालयात नोकरीस असलेले कार्यकारी अभियंता यांच्याकडे जून ते ऑक्टोबर २०२३ या पाच महिन्याचे पगार बिल काढण्यासाठी प्रत्येक महिन्याचे दोन हजार याप्रमाणे दहा हजार रुपये लाच त्यांच्याच कार्यालयातील लिपिक शिवाजी ढोरमारे यांनी मागितली. याबाबत बीडच्या लाच लुचपत प्रतिबंधक कार्यालयाकडे तक्रार दाखल करण्यात आली. या प्रकरणी सापळा लावल्यानंतर ढोरमारे यांनी दहा हजार रुपये लाच स्वीकारताना त्यांना अटक करण्यात आली. आपल्याच साहेबांना लाच मागणार्या लिपिकाला अटक झाल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे.

राज्यात मोठ्या क्षेत्रावर बांबू लागवड होण्यासाठी ; सांघिक प्रयत्न करा मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंचे आवाहन

बांबू टास्क फोर्सच्या पहिल्या बैठकीत मुख्यमंत्र्यांनी घेतला आढावा

मुंबई (प्रतिनिधी)

राज्यात जास्तीत जास्त क्षेत्रावर बांबू लागवड होण्याकरिता विविध विभागांनी समन्वयाने आणि सांघिकरित्या प्रयत्न करावे, असे आवाहन करतांनाच पर्यावरण संवर्धन आणि शेतकऱ्यांच्या समृद्धीसाठी बांबू लागवड उपयोगी असल्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले. मंत्रालयात आयोजित पहिल्या बांबू टास्क फोर्सच्या बैठकीत ते बोलत होते.

या बैठकीला उद्योग मंत्री उदय सामंत, मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड, राज्य कृषी मूल्य आयोगाचे अध्यक्ष पाशा पटेल, कृषी विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव, अनुपकुमार, मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव विकास खारगे, पर्यावरण विभागाचे प्रधान सचिव प्रविण दराडे, वन विभागाचे प्रधान सचिव वेणूगोपाल रेड्डी, रोहयो विभागाचे प्रधान सचिव दिनेश वाघमारे आदिवासी विकास विभागाचे प्रधान सचिव विजय वाघमारे, नंदकुमार, मनरेगा मिशन महासंचालक, दीपेंद्र सिंह कुशवाह विकास आयुक्त (उद्योग), सुनील चव्हाण, मृद व जलसंधारण सचिव, संजीव करपे, संचालक कोनबॅक, कृणाल नेगांधी संचालक ज्युरियन सर्स्टेनेबिलिटी यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते.

यावेळी मुख्यमंत्री श्री. शिंदे म्हणाले की, जगभरात प्रदुषणाची समस्या वाढत आहे, वातावरण बदलामुळे पुढील पिढ्यांसमोर मोठे संकट उभे ठाकले आहे. पर्यावरण रक्षण आणि ऊर्जा संकटाचा मुकाबला करण्यासाठी बांबू लागवड हा महत्वाचा पर्याय ठरणार आहे. तसेच बांबूची वाढती मागणी लक्षात घेता शेतकऱ्यांनी बांबू लागवड केल्यास त्यांना मोठा आर्थिक फायदा मिळू शकणार आहे. शेतकऱ्यांनी बांबू क्लस्टर निर्माण करण्याचे आवाहन आपण केले आहे. त्याप्रमाणे शेतकऱ्यांना बांबू लागवड करण्याकरिता प्रोत्साहन देण्याचे आपले धोरण आहे. हे धोरण यशस्वी करण्यासाठी राज्यात बांबू लागवडीचे क्षेत्र वाढविण्यासाठी कृषी, वन, सामाजिक वनीकरण, पर्यावरण यासह सर्व विभागांनी सकारात्मक भावनेतून टीम म्हणून काम करावे. तसेच यासाठी आवश्यक निधी 'मनरेगा'च्या माध्यमातून रोजगार हमी योजना विभागाकडून उपलब्ध करुन देण्याच्या सूचना मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिल्या.

बैठकीच्या सुरुवातीला बांबू लागवडीविषयी सादरीकरण करतांना श्री.पटेल यांनी सांगितले की, राज्यात येत्या ५ वर्षात १० लाख हेक्टर क्षेत्रावर बांबू लागवड करण्याचे मुख्यमंत्री शिंदे यांचे स्वप्न आहे. या स्वप्नपूर्तीसाठी बांबू टास्क फोर्सच्या माध्यमातून काम सुरु असल्याचेही त्यांनी सांगितले.

वसंतनगर येथे वनविभाग अंधारखोळीत ३० लाख लिटर

साठवण क्षमतेच्या जलकुंभ युवकांच्या श्रमदानातून तयार

परळी (प्रतिनिधी)

वसंतनगर येथे राष्ट्रीय सेवा योजना वैद्यनाथ कॉलेज व ग्रामपंचायत वंसतनगर यांच्या संयुक्त विद्यमाने ७ दिवशीय शिबिर '' युवकांचा ध्यास ग्राम - शहर विकास '' दि . ८ ते १४ फेब्रुवारी २०२४ या कालवधीत संकल्पनावर घेऊन जल सक्षारता संवर्धन, पाणी अडवा पाणी जिरवा , पर्यावरण आकलन आचरण आणि श्रमदानातून एकशे पंचवीस युवक - युवतीच्या दोनशे पन्नास हातानी , सात दिवस सलग आठ तास श्रमदानतून तासात अंधार खोळी परिसर वनविभाग डोंगऱ्याच्या कुशीत हा जलकुंभ पाझर तलाव श्रमदान तयार केला .

डोंगर दऱ्यातून दगड, माती , खोदकाम करत पाणी अडवण्यासाठीची माती -दगडाची पाळू पंधारा फुट भिंत उभी केली असून , युवक -युवतीनी एक एक करत सोळा हजार दगड - गोटे गोळा करून पाण्या आडवण्यासाठी तट भिंत श्रमदानातून उभा केली . मागच्या वर्षी हा बंधारा एन . एस . एस . वैद्यनाथ कॉलेज युवकांच्या श्रमदानातून बारा लाख लिटर क्षमतेचा केला होता . त्या पाणीचा उपयोग वन्य प्राणी, पशुपक्षी , पाळीव गाई, म्हशी, शेळयाना झाला . यावर्षी बंधारा उंची व खोली , रूंदी श्रमदानातून वाढवली असून त्याची क्षमता तीस लाख लिटर क्षमता केली आहे . या जलकुंभास जवाहर एज्युकेशन सोसायटीचे सचिव श्री . दत्ताप्पा ईटके गुरूजी, प्राचार्य डॉ . रमेश राठोड यांनी भेट देऊन उपक्रमचे कौतुक केले . हि संकल्पना रा . से . यो. संयोजक प्रा . डॉ . माधव रोडे, व सखाराम नाईक ज्युनिअर कॉलज प्राचार्य अरूण पवार , सरपंच विजय राठोड यांच्या राबविली . यात विशेष सहभाग याकार्यक्रमधिकारी प्रा . डॉ . भीमानंद गजभारे, प्रा . दिलीप गायकवाड, प्रा .डॉ . श्रीहरी गुट्टे, विश्वजीत हके, सौरभ सातपुते, राम फड, दिव्या भोयटे, अर्पणा ओपळे, अभिषेक रोडे, आरती शिंदे, नेहा आदोडे, किर्तीश्रवर गीत्ते, कृष्णा रोडे, ज्ञानेश्रवर मुंडे, योगेश ढाकणे, होंळबे, आदि घेतला .

संपादकीय

फेरीवाले पदपथावर, चालायचे कुठून?

मुंबईकरांना चालण्यासाठी मोकळे फुटपाथ देता येत नसतील, तर त्यांच्यासाठी नवे फुटपाथ तयार करा, असा उपरोधिक टोला मुंबई उच्च न्यायालयाने मुंबई महापालिकेला नुकत्याच झालेल्या सुनावणीदरम्यान लगावला. फुटपाथवरून केवळ लोकांनाच चालता येईल, असे नियोजन महापालिकेने करायला हवे. किमान प्रायोगिक तत्त्वावर तरी हे नियोजन हवे, अशी सूचना देण्याची वेळ खंडपीठावर आली. राज्यघटनेने सन्मानाने जगण्याचा अधिकार प्रत्येकाला दिलेला आहे. मुंबईकरांना मोकळे फुटपाथ (पदपथ) मिळत नसतील, तर त्यांच्या सन्मानाने जगण्याच्या अधिकारावर गदा येत नाही का?, असा संतप्त सवाल महापालिकेला या सुनावणीदरम्यान विचारण्यात आला होता. खंडपीठाने संताप व्यक्त करत महापालिका प्रशासनाला पुन्हा एकदा धारेवर धरले आणि या अनधिकृत फेरीवाल्यांना कायमस्वरूपी हटविण्यात तुम्हाला नेमक्या काय अडचणी आहेत? याची माहिती न्यायालयात सादर करण्याचे आदेश पालिकेला दिले आहेत. आता या याचिकेवरील पुढील सुनावणी १ मार्च रोजी होणार आहे.

बोरिवली स्थानकाबाहेरील दुकानांसमोर काही फेरीवाले बसतात. त्यांच्यामुळे रहदारीसाठी लोकांना रस्ता मिळत नाही. या फेरीवाल्यांना हटवावे, या मागणीसाठी तेथील काही दुकानदारांनी उच्च न्यायालयात याचिका सादर केली होती. त्याची दखल घेत या प्रकरणी उच्च न्यायालयाने हा एका भागाचा नव्हे, तर मुंबई शहरातील फेरीवाल्यांच्या अतिक्रमणाचा प्रश्न असल्याचा मुद्दा मांडत सुमोटो याचिका दाखल करून घेतली. न्यायमूर्ती गौतम पटेल व न्यायमूर्ती कमल खता यांच्या खंडपीठासमोर या याचिकेवर सुनावणी झाली. जर मुंबई महापालिका ही मुंबईतील पायाभूत सुविधांचे नियोजन करते, फेरीवाला क्षेत्र निश्चित करण्याबरोबर फेरीवाल्यांना परवाना देण्याचे काम पालिकेचे असेल, तर त्यांचे अतिक्रमण रोखण्याची जबाबदारी पालिकेची नाही का?, असे निरीक्षण खंडपीठाने नोंदविले. मुंबईतील कोणत्याही रस्त्याच्या आजूबाजूला पाहा. सर्वच फुटपाथवर फेरीवाले कसे दिसतात?, या फेरीवाल्यांचे नियोजन करण्यासाठी तुमच्या अधिकाऱ्यांकडे काही तोडगा कसा नाही?, असा सवाल खंडपीठाने पालिकेला विचारला आहे. या न्यायालयातील प्रलंबित याचिकेमुळे जनतेचे पुन्हा एकदा फेरीवाल्यांच्या अतिक्रमणाच्या प्रश्नांकडे लक्ष गेले आहे.

मुंबईतील फेरीवाल्यांचे २०१४ साली मुंबई महापालिकेने सर्वेक्षण केले होते. त्यानुसार ३२ हजार फेरीवाले पात्र ठरविण्यात आले आहेत. मुंबईत सुमारे तीन लाख फेरीवाले असताना केवळ ३२ हजार फेरीवाल्यांना पात्र कसे ठरवू शकता?, असा सवाल फेरीवाला संघटनेच्या प्रतिनिधींनी उपस्थित केला होता. फेरीवाला धोरणाची अंमलबजावणी करण्याआधी फेरीवाला धोरण निश्चिती प्रक्रियेला फेरीवाला संघटनांनी (टाऊन वेंडिंग कमिटी) विरोध केल्यामुळे फेरीवाला धोरण वादात सापडले होते. त्याचे कारण या सर्वेक्षणातून अनेक फेरीवाले सुटले असल्याने फेरीवाला धोरणाची अंमलबजावणी करताना सर्व फेरीवाल्यांचा विचार करायला हवा. त्यांना न्याय दिला पाहिजे.

मुख्यपृष्ठ बोर्ड एक्झाम २०२४ : १० वी/ १२ वी च्या परीक्षेसंदर्भात महत्वाची अपडेट

विद्यार्थ्यांना 'हे' नियम पाळावे लागणार

किल्ले धारूर ।प्रतिनिधी

करिअरनामा ऑनलाईन महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च बोर्ड एक्झाम २०२४ माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे डी. २१ फेब्रुवारी ते १९ मार्चदरम्यान बारावी तर १ मार्च ते २६ मार्चदरम्यान दहावीची परीक्षा घेतली जाणार आहे. यंदा विभागातून दहावीच्या परीक्षेसाठी एक लाख ८६ हजार ८१४ विद्यार्थी; तर बारावीसाठी एक लाख ७९ हजार १४ विद्यार्थी बसले आहेत. शिक्षण मंडळाकडून परीक्षेची जोरदार तयारी सुरू आहे. या पार्श्वभूमीवर विभागीय शिक्षण मंडळातर्फे नुकतीच विभागातील सर्व जिल्हानिहाय मुख्याध्यापक आणि केंद्रप्रमुखांची बैठक घेण्यात आली आहे. यावेळी परीक्षेच्या दृष्टिकोनातून केंद्रावर आवश्यक सुविधा उपलब्ध करण्याच्या सूचना देण्यात आल्या.या बैठकीत एका बेंचवर एकच विद्यार्थी असावा, परीक्षेतील गैरप्रकार टाळावेत, परीक्षा केंद्र परिसरात मुलांना बसण्यासाठी मंडप उभारू नये, पिण्याचे पाणी, फॅन, लाइट अशा भौतिक सुविधा उपलब्ध असाव्यात, केंद्रावर कोणताही

गैरप्रकार घडणार नाही, याची खबरदारी घ्यावी, अशा सूचना देण्यात आल्या.दहावी, बारावी परीक्षेत गैरप्रकार किंवा भौतिक सुविधांचा अभाव आढळल्यास बोर्डाच्या नियमानुसार त्या केंद्राचे संकेतांक गोठविण्यात येणार आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांची गैरसोय होणार नाही, याची काळजी घ्यावी; तसेच विद्यार्थ्यांसाठी सर्व आवश्यक भौतिक सुविधा उपलब्ध कराव्यात, अशा सूचना विभागीय मंडळाने केंद्रांना दिल्या आहेत. दहावी, बारावी परीक्षेच्या अनुषंगाने विभागीय मंडळाने बोर्ड एक्झाम २०२४केंद्रसंचालकांकडून हमीपत्र भरून घेतले आहे. यामध्ये असे म्हटले आहे, की प्रत्येक वर्गात केवळ २५ विद्यार्थी असतील. परीक्षा कक्षात योग्य असा प्रकाश, पंखे, लाइट अशी सुविधा असेल. पर्यवेक्षणासाठी मान्यताप्राप्त शाळेतील नियमित शिक्षक असेल. ओळखपत्रानुसारच कर्मचाऱ्यांना केंद्रात प्रवेश दिला जाईल इतरांना प्रवेश दिला जाणार नाही,सी सी टीव्ही च्या निगराणीत होणार तपासणी बोर्ड एक्झाम २०२४,परीक्षा सुरू होण्यापूर्वी प्रवेशद्वारावर प्रत्येक विद्यार्थ्याची आवश्यक ते पथक नियुक्त करून तपासणी करण्यात येईल. कोणताही परीक्षार्थी अवैध साहित्य अथवा कागद सोबत घेऊन परीक्षा दालनात प्रविष्ट होणार नाही. तपासणी सीसीटीव्हीच्या निगराणीत होईल. त्याचे फुटेज परीक्षा संपेपर्यंत जतन करण्यात येईल. परीक्षा कालावधीत ज्या विषयाची परीक्षा आहे त्या विषयाचा शिक्षक केंद्रावर आढळून आल्यास त्याच्यावर कारवाई करण्यात येईल. यास 'मी जबाबदार असेल', असे पत्र केंद्रसंचालकांकडून बोर्डाने भरून घेतले आहे. परीक्षा केंद्रावर गैरप्रकार अथवा भौतिक सुविधांचा अभाव आढळून आल्यास बोर्डाच्या नियमानुसार कारवाई करून संकेतांक गोठवण्यात येईल; अशा सूचना; विभागीय शिक्षण मंडळाच्या सचिव डॉ. वैशाली जामदार यांनी दिल्या आहेत.

केज नगराध्यक्षांच्या घरासमोर आमरण उपोषण

दलित वस्तीचा निधी इतरत्र वापरू नये : उपोषण कर्त्याची मागणी

केज - लोकशाहीर अण्णाभाऊ साठे दलित वस्ती सुधार योजनेचा विकास निधी दलित वस्ती ऐवजी इतरत्र वापरून खर्च केला जात असल्याने केज नगर पंचायतीचे माजी नगरसेवक कपिल मस्के हे नगराध्यक्ष सिताताई बनसोड यांच्या घरासमोर चार दिवसां पासून आमरण उपोषणाला बसले आहेत.

केज येथील राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते आणि माजी नगरसेवक कपिल मस्के हे दि. १२ फेब्रुवारी पासून फुले नगर येथे नगराध्यक्षा सिताताई बनसोड यांच्या निवासस्थाना समोर उपोषणाला बसले आहेत. त्यांनी अशी मागणी केली आहे की, लोकशाहीर आण्णाभाऊ साठे दलित वस्ती सुधार योजना अंतर्गत विकास मंजुर झालेल्या सिमेंट काँक्रिट रस्ता दलित वस्तीमध्ये न करता जिथे नागरिक राहत नाहीत तिथे रस्ता केला जात आहे. नागरिकांची अशी मागणी आहे, की, कळंब रोड पासुन रस्त्याच्या कामाला सुरवात करून जिथं पर्यंत रस्ता जात आहे तिथ पर्यंत करण्यात यावा. विकास निधीतुन होणाऱ्या रस्त्यावर गुत्तेदार यांनी कामाची मंजूर रक्कम व कामाचे स्वरूप याची माहिती देणारा नाम फलक लावावा. साहित्य रत्न आण्णाभाऊ साठे सामाजिक सभागृहाच्या छतावर एक व्यक्तीने संडास बाथरूमचे बांधकाम करून त्यावर केलेले अतिक्रमण काढण्यात यावे. राजाभाऊ सिरसट यांच्या पश्चिमे कडील असणारे दहा फुटाच्या रस्त्यावरील अतिक्रमण काढण्यात यावे. शहरातील रमाई आवास योजने अंतर्गत मंजुर झालेल्या सर्व लाभार्थ्यांना त्यांचे सर्व हप्ते देण्यात यावे. सर्वे नंबर १७/१, १७/२ मध्ये डी. पी. प्लॅन नुसार न्यायालयीन कर्मचारीसाठी निवासस्थान करीता आरक्षित केलेल्या जागेवरचे बांधकाम तात्काळ थांबुन त्याची बेकायदेशीर खरेदी-विक्री करणा-यावर कायदेशीर कार्यवाही करण्यात यावी. स.नं.१३ मधील एस.टी. डेपो च्या कंपाऊंड लगत जाणाऱ्या १८ मीटरचा रस्त्यावरचे अतिक्रमण हटवून खुला करण्यात यावा. सर्वे नं. १७ मधुन उमरी रस्ता ते बीड-परळी राज्य मार्ग या डी. पी. रस्त्यावरील अतिक्रमण काढुन रस्ता नागरिकांसाठी खुला करण्यात यावा. या प्रमुख मागण्या आहेत. उपोषणाला चार दिवस झाले असून अद्यापही प्रशासनाने दखल घेतली गेली नाही

तीन राज्यातील हजारो समाज बांधवांच्या उपस्थितीत

गवळी समाजातील ३८ जोडपी झाली विवाहबद्ध

नांदेड : आज १३ फेब्रुवारी २०२४ रोजी श्री यादव अहिर गवळी समाजाचा सामूहिक विवाह सोहळा द्वारिकाधाम, नरहर कुरुंदकर हायस्कुल मैदान, कौठा, नांदेड़ येथे संपन्न झाला. आंध्रप्रदेश,तेलंगणा,मध्यप्रदेश आणि संपूर्ण महाराष्ट्रातून एकूण ३८ जोडपी या आदर्श अंतरराज्यीय विवाह सोहोळ्यात विवाहबद्ध झाली. नांदेड़ येथील गवळी समाज मागील २५ वर्षापासुन असे सामूहिक विवाह समारोह आयोजित करतो ज्यात आतापर्यंत ८३१ जोडपी विवाहबद्ध झाली आहेत यावेळी जवळपास २० हजार समाज बांधव नवदंपतिला शुभाशीर्वाद देण्याकरिता येथे जमले होतो संपूर्ण विवाह सोहळा यशस्वी करण्यासाठी गुरुद्वारा बाबा दीपसिंघजी बोर्ड, श्री कृष्ण कोकाटे साहेब नांदेड़ पोलीस अधीक्षक, नरहर कुरुंदकर शाळेचे संचालक मंडळ, उपायुक्त अजितपाल संधू, महानगरपालिका नांदेड़, वाहतुक शाखा ०२ चे इतवारा येथील पोलीस निरीक्षक रावसाहेब गुट्टे, राजू भैया गोरे, तसेच ग्रामीण पोलीस स्टेशनच्या पूर्ण यंत्रणेने मोलाची भूमिका बजावली आहे या महाकुंभात

स्वच्छता, सुरक्षितता,अबाधित ठेवण्यासाठी संपूर्ण यादव अहीर गवळी समाज उपरोक्त मान्यवरांचा आभारी आहे असे अध्यक्ष दुर्गाप्रसाद बटाउवाले यांनी सांगितले दोन दिवस चाललेल्या या कार्यक्रमात अनेक समिति स्थापन करून अत्यंत नियोजनबद्ध पद्धतीने सदर सोहळा संपन्न करण्यात आला ज्यात भोजन समिति,वैवाहिक कार्यक्रम समिति, बिछायत,कन्यादान,रूम व्ययस्थान,वाहतुक, खरेदी,मंच संचालन आदींचा समावेश होता वैवाहिक कार्यक्रम अत्यंत दिमाखदार पद्धतीने सर्व समाज वैवाहिक विधि पूर्ण करत ३८ ब्राह्मणाच्या उपस्थितीत मंत्रोच्चारण करून अत्यल्प खर्चात झालेत ज्यामुळे समाज बांधवांचे करोड़ों रुपए वाचले आहेत. आजकाल पैशाची उधळपट्टी करून होणाऱ्या विवाह करणाऱ्यासमोर यादव समाजाने एक आदर्श ठेवला आहे अशी भावना उपायुक्त संधू यांनी व्यक्त केली तर यादव समाज हा अत्यंत गतिमान पद्धतीने आपली सर्वांगीण प्रगती साधेल असे मत रावसाहेब गुट्टे यांनी व्यक्त केले. हा दोन दिवसाचा सोहळा यशस्वी करण्यासाठी मागील अनेक महिन्यापासून संपूर्ण गवळी समाजातील महिला, आबालवृद्ध एकंदरीत संपूर्ण समाजाने खूप मेहनत घेतली आहे

उमापूर येथे संत सेवालाल महाराज जयंती उत्साहात साजरी

गेवराई । प्रतिनिधी

दि. १५ तालुक्यातील उमापूर येथे ठीकठीकाणी समाज सुधारक संत सेवालाल महाराज यांची जयंती मोठ्या उत्साहात सेवालाल महाराज यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून साजरी करण्यात आली. तसेच सायंकाळी ढोल - ताशांच्या गजरात भव्य मिरवणूक काढण्यात येणार आहे. यावेळी मा. सरपंच महेश आहेर, राजाभाऊ पोकळे, ग्रा. पं. सदस्य अंकुश राठोड,यशवंत कापसे, विजय वराट,महादेव वीर, रवी कापसे, नवनाथ राठोड, लहु जाधव, रघु जाधव, आरुण जाधव, आमोल राठोड, नितिन जाधव, अजय औटी, संतोष गीरी, सखाराम चेडे, विष्णु राठोड, संतोष चव्हाण, ज्ञानेश्वर हवाले, संतोष दिलवाले, जुबेर कुरेशी, जयदिप औटी, अशोक वडघणे, ईलियास सौदागर सह शेकडो ग्रामस्थ उपस्थित होते.

रोहितळ येथे भरदिवसा डॉक्टराचे घर फोडले



गेवराई । प्रतिनिधी

मागील आठवड्यात झालेल्या घरफोडीच्या घटनेचा तपास लागण्यापूर्वीच रोहीतळ येथील एका डॉक्टरचे भरदुपारी घर फोडले. रोख २५ हजार आणि १० ग्रॅम सोने असा मुद्देमाल चोरून नेला. ही घटना (दि.१४) दुपारी घडली.

रोहितळ (ता. गेवराई) येथे मागील आठवडयात शिवलिंग गायकवाड या कापूस व्यापा-याचे अज्ञात चोरट्यांनी घर फोडून ३ लाखांचा मुद्देमाल चोरून नेला होता. या घटनेच्या तपास लागण्यापूर्वीच आज डॉ. किरण ढगे यांच्या घरात चोरी झाली. ढगे यांच्या पत्नी गावात किर्तनास गेल्या होत्या. त्यातच सध्या सुगीचे दिवस असल्याने गावात शुकशुकाट होता. या संधीचा फायदा घेत अज्ञात चोरट्यांनी भरदुपारी ढगे यांचे घर फोडले. आणि रोख २५ हजार व १० ग्रॅम सोने असा साधारण एक लाखाचा मुद्देमाला चोरून नेला.

या घटनेची माहिती मिळताच तलवाडा पोलीस ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक सोमनाथ नरके, फौजदार स्वप्नील कोळी, बीट जमादार हरिभाऊ बांगर,

भगवान खाडे घटनास्थळी दाखल झाले. श्वान पथकाला पाचारण करण्यात आले. दरम्यान, रोहितळ येथे चोरीची दुसरी घटना घडल्याने ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

सगे सोयरेच्या जीआर साठी पुकारलेला महाराष्ट्र बंदला आष्टी तालुक्यातील धामणगाव घाटापिपरी,येथील व्यापारी व दुकानदराने बाजारपेठा बंद ठेवून चांगला प्रतिसाद दिला यावेळी अंभोरा पोलीस ठाण्याचे सपोनी मंगेश साळवे, पोलीस अमलदार शिवदास केदार, कर्मचारी कांबळे,, यांनी उपबाजार पेठ धामणगाव येथे बंद च्या परिसराची पाहणी केली. छायाचित्र,(सुरेश कांबळे)

आज जागतिक रेडिओ दिनानिमित्त आकाशवाणी केंद्र अहमदनगर येथे भेट देऊन केंद्रप्रमुख श्री राजेद्रजी दासरी साहेब व इतर कर्मचारी वृंद यांचे बरोबर हितगुज करुन त्याचे कार्याचा गौरव करण्यात आला याप्रसंगी श्री विश्वनाथ पोदे श्री अभय गांधी श्री प्रमोदकुमार छाजेड छाया प्रशांत बाफना प्रतिनिधी

लोणगाव ग्रामपंचायत मध्ये संत सेवालाल महाराज यांची जयंती साजरी

संत सेवालाल महाराज यांचा जन्म १५ फेब्रुवारी १७३९ झाला. हे बंजारा समाजाचे आराध्य दैवत मानले जाते त्या अनुषंगाने लोणगाव ग्रामपंचायत मध्ये सेवालाल महाराज यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली जयंती साजरी करताना लोणगाव चे सरपंच नारायण नाना राऊत मानवाधिकार संघटनेचे मराठवाडा प्रमुख व्यंकटेश सोनकांबळे प्रकाश सोनकांबळे गणेश महाराज कोळसे अरुण राऊत संजय पवार शरद पवार सुदाम आलाट बालासाहेब रासवे अनिस भाई ज्ञानेश्वर सोनुळकर बाबुराव मायकर नितीन सोनकांबळे नितीन सोनकांबळे संतोष चव्हाण गोविंद कोळसे ए आय एम आय एम चे युवा नेते अन्साराम आलाट ग्रामसेवक श्री पवार साहेब यांच्यासह गावातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते

सोलापूर येथे ५ वे अदिवासी साहित्य संमेलन – प्रा. अभिमन्नू टकले

लातूर ।प्रतिनिधी

सोलापूर येथे २४ व २५ फेब्रुवारी असे दोन दिवस ५ वे आदिवासी धनगर साहित्य संमेलन होणार आहे.याचे उदघाटन डॉ. श्रीपाल सबनीस यांच्या हस्ते तर समारोप श्रीमंत कोकार यांच्या उपस्थितीत होणार असल्याची माहिती या साहित्य संमेलनांचे संस्थापक प्रा. अभिमन्नू टकले यांनी लातूर येथे पत्रकार परिषदेत दिली.

५ वे आदिवासी धनगर साहित्य संमेलन हे सोलापूर पासून जवळच असलेल्या बेल्लारी या गावी २४ व २५ फेब्रुवारी असे दोन दिवस आयोजित करण्यात आले आहे. वेगवेगळ्या विषयावर परिसंवाद, कवी संमेलन, सांस्कृतिक कार्यक्रम या संमेलनामध्ये आयोजीत करण्यात आले आहे. संमेलनात आ. प्रणिती शिंदे, न. प. प्रशासन विभाग सहाय्यक आयुक्त रामदास कोकरे, इंदोरचे डॉ. एन.जी. काळे, धर्मराज कागदी, सांगोल्याचे डॉ. वर्षा देशमुख, करमाळ्याचे प्रा. शिवाजी बंडगर, पोलिस अधिकारी सोमनाथ करणावाल पाटील, संजय सोनवणी पुणे, बीभीषण पटेल सोलसूर आदी १२ जणांना याचवेळी पुरस्कार देण्यात येणार असल्याची घोषणा करण्यात आली. या पत्रकार परिषदेस संभाजी सूळ, पाचव्या आदिवासी धनगर साहित्य संमेलनाचे स्वागताध्यक श्रीराम पाटील वेलाटीकर, प्राचार्य मधुकर सलगरे, चंद्रकात हजारे आदिची उपस्थिती होती.

माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी

बाभळगाव निवासस्थानी नागरिकांच्या घेतल्या भेटी

लातूर ।प्रतिनिधी

राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण सांस्कृतिक कार्यमंत्री व लातूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी गुरुवार दि. १५ फेब्रुवारी रोजी सकाळी बाभळगाव निवासस्थानी लातूर शहरासह जिल्हाभरातून आलेल्या विविध संस्था पदाधिकारी काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी कार्यकर्ते नागरिकांच्या

भेटी घेऊन त्यांच्या निवेदनाचा व आमंत्रणाचा स्वीकार करून संबंधितांना पुढील आवश्यक कार्यवाहीसाठी सूचना केल्या. याप्रसंगी लातूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती ललीतभाई शहा,महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे सचिव अभय साळुंखे, माजी नगराध्यक्ष लक्ष्मण कांबळे, ट्वेंटीवन शुगरचे व्हा.चेअरमन विजय देशमुख, महादेव मुळे, प्रा.व्ही.एस अंकलकोटे, एस.एन गायकवाड, जितेंद्र स्वामी, बाभळगावचे उपसरपंच गोविंद देशमुख, काँग्रेस पक्षाचे

प्रभाग क्र.१४चे अध्यक्ष धनंजय शेळके, क्रीडा मार्गदर्शक विष्णू चाकूरकर, दत्ता सोमवंशी, हनमंत पवार, अभिमान भोळे, सरिता देशमुख, सुरेश धानूरे, प्रल्हाद सुरवसे, श्रीकांत पाटील, अमर पाटील आदिसह काँग्रेस पक्षाचे विविध पदाधिकारी, कार्यकर्ते, नागरिक उपस्थित होते.

माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी

राष्ट्रीय तलवारबाजी स्पर्धेतील विजेत्यांचे केले अभिनंदन

लातूर ।प्रतिनिधी

राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण सांस्कृतिक कार्यमंत्री व लातूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी गुरुवार दि. १५ फेब्रुवारी रोजी बाभळगाव निवासस्थानी लातूर फेन्सिंग (तलवारबाजी) अकॅडमीच्या राष्ट्रीय तलवारबाजी स्पर्धा, खेलो इंडिया स्पर्धा, राज्यस्तरीय तलवारबाजी स्पर्धेतील विविध पदक प्राप्त विजेत्या खेळाडूंचे अभिनंदन करून त्यांना पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांच्या पुढाकारातून लातूर येथील खेळाडूंना तलवारबाजी खेळण्यासाठी सुवीधा व्हाव्यात यासाठी

लातूर फेन्सिंग(तलवारबाजी) अकॅडमीला तलवारबाजीच्या साहित्यासाठी २० लाख रुपयांचा निधी देण्यात आला आहे.यावेळी शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार प्राप्त प्रा. प्रशिक्षक दत्ता गलाले, अहिल्यादेवी होळकर माध्यमिक विद्यालय अहमदपूरचे मुख्याध्यापक तथा सहायक प्रशिक्षक प्रशांत माने, खेळाडू सुवर्ण पदक विजेती माही आरदवाड,सुवर्ण पदक विजेती जान्हवी जाधव, वैभवी माने, रोहीणी पाटील, दिव्यांका कदम, स्नेहा कश्यप, सुरज कदम, भाऊराव कदम आदी उपस्थित होते.

धर्माबाद न्यायालय व नगरपरिषद यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित भव्य क्रिकेट स्पर्धत

धर्माबाद नगरपरिषद ठरले चॅम्पियन ट्रॉफीचे मानकरी

धर्माबाद /प्रतिनिधी

धर्माबाद शहरातील लालबहादूर शास्त्री महाविद्यालयाच्या प्रांगणात चॅम्पियन ट्रॉफीचे आयोजन करण्यात आले होते. धर्माबाद न्यायालयाच्या न्यायमूर्ती श्रीमती सपना हरणे यांच्या संकल्पनेतून व नगरपरिषद धर्माबाद यांच्या सौजन्याने धर्माबाद उमरी आणि बिलोली येथील न्यायालयीन कर्मचारी व धर्माबाद येथील प्रशासकीय कर्मचाऱ्यांचे क्रिकेट खेळाचे सामने आयोजित करण्याचा हेतू श्रीमती सपना हरणे यांचा होता.

सामन्याच्या उद्घाटन प्रसंगी धर्माबाद न्यायालयाचे न्यायाधीश श्रीमती सपना हरणे म्हणाल्या की, यामागचा मुख्य उद्देश दैनंदिन कामाच्या ताण तणावातून कर्मचाऱ्यांना थोडासा दिलासा मिळावा. धावपळीच्या ह्या जनजीवनात व्यस्ततेत जीवन जगत असताना आपल्या शरीरावर लक्ष देणे सुद्धा तेवढेच गरजेचे बनलेले आहे. सर्व कर्मचाऱ्यांचे मानसिक व शारीरिक सुदृढता ही महत्त्वाची आहे, असे मत उद्घाटन प्रसंगी धर्माबाद न्यायालयाच्या न्यायाधीश श्रीमती सपना हरणे यांनी व्यक्त केले.

चॅम्पियन ट्रॉफीच्या खेळवल्या गेलेल्या या सामन्यात एकूण आठ टीम यामध्ये सहभागी झाल्या होत्या.तर या टीम मध्ये सात सामने खेळवण्यात आले. सहभागी झालेल्या स्पर्धकांमध्ये धर्माबाद न्यायालय, धर्माबाद पोलीस स्टेशन ,धर्माबाद महसूल कार्यालय ,धर्माबाद पंचायत समिती, उमरी न्यायालय, बिलोली न्यायालय आणि बिलोली वकील संघ अशा संघाचा समावेश होता. अत्यंत चुरशीच्या झालेल्या सेमी फायनल मध्ये धर्माबाद

पोलीस स्टेशन विरुद्ध धर्माबाद नगरपरिषद हा सामना अत्यंत रोमहर्षक झाला. यामध्ये धर्माबाद नगर प्रशासनाने विजयश्री खेचून आणली. तर दुसऱ्या सेमी फायनल मध्ये धर्माबाद न्यायालय यांच्याविरुद्ध धर्माबाद महसूल प्रशासन यांच्यामध्ये हा सामना झाला. अंतिम सामन्यांमध्ये धर्माबाद नगर प्रशासन व धर्माबाद महसूल प्रशासन यांच्यामध्ये अंतिम सामना होऊन अंतिम सामना हा धर्माबाद नगरपालिकेने निर्विवाद जिंकला. या सामन्यामध्ये सामनावीर म्हणून धर्माबाद नगर परिषदेचे टॅक्स ऑफिसर गोविंद जक्कावाड हे मानकरी ठरले. या सामन्याला प्रमुख उपस्थितीमध्ये उद्घाटक व प्रमुख पाहुणे म्हणून डी इ कोठलीकर,जिल्हा न्यायाधीश १ बिलोली मा.श्री व्ही बी बोहरा तदर्थ जिल्हा न्यायाधीश बिलोली, मा. श्री ए ए के शेख दिवाणी न्यायाधीश बिलोली, मा.श्रीमती एस ए हरणे दिवाणी न्यायाधीश धर्माबाद, मा.श्री ए बी रेडेकर दिवाणी न्यायाधीश उमरी, श्रीमती स्वाती दाभाडे उपविभागीय अधिकारी धर्माबाद श्रीमती नीलम कांबळे प्रभारी मुख्याधिकारी धर्माबाद यांची प्रमुख उपस्थिती होती.

धर्माबाद नगरपालिकेच्या टीमचे कुशल नेतृत्व धर्माबाद नगरपालिकेचे लेखाधिकारी गुरुनाथ कस्तुरे यांनी केले होते.विजया नंतर धर्माबाद नगर परिषदेच्या क्रिकेट टीमचे कर्णधार व नगरपरिषदेचे लेखाधिकारी गुरुनाथ कस्तुरे यांची प्रतिक्रिया घेतली असता ते म्हणाले की विजय पराजय हा खेळाडू वृत्तीने स्वीकार्याचा असतो खेळामध्ये तो निश्चित आहेच परंतु दैनंदिन जीवनामध्ये नगरपालिकेत काम करत असताना आम्ही सर्व टीम एक परिवार म्हणून काम करतो. आज त्याचे फळ आम्हाला मिळाले. मैदानावर असू द्या किंवा कार्यालयात असू द्या सर्व कर्मचाऱ्यांचे जीव ओतून काम केले तर निश्चितच ते कार्य यशस्वी होते आणि त्याचीच प्रचिती आम्हाला आज या खेळामध्ये मिळाली आहे. धर्माबाद नगर परिषदेच्या सर्व कर्मचाऱ्यांनी एकसंघतेने जो खेळ खेळला त्यातून इतरांनी ही प्रेरणा घ्यावी आणि आपल्या कार्यालयात अशीच एकी कर्मचाऱ्यांमध्ये असावी. जेणेकरून आपल्या प्रत्येक कार्यामध्ये यश मिळतच जाईल धर्माबाद शहराला स्वच्छ सुंदर शहर करण्यासाठी सुद्धा आम्हा सर्व कर्मचाऱ्यांचा असाच प्रयत्न आहे. फक्त गरज आहे धर्माबाद मधील सर्व नागरिकांनी आम्हाला सहकार्य करण्याची आणि ते उत्तमपणे धर्माबाद चे नागरिकांना सहकार्य करीत आहेत.धर्माबाद नगर परिषदेच्या टीम मध्ये राजेश स्वामी, संतोष मुंडे, रामसिंग लोध, गोविंद जक्केवाड, रवी उमडे, नागेश अपलोड, संतोष पवार, किरण बिचकेवार, सूर्यकांत पौळ, गंगाधर सूर्यवंशी, लक्ष्मण झुंजारे या सर्व कर्मचाऱ्यांनी सहभाग घेतला होता. तरी या टीमला मार्गदर्शन म्हणून परिषदेचे प्रशासक स्वाती दाभाडे धर्माबाद नगर पालिकेच्या प्रभारी मुख्याधिकारी नीलम कांबळे यांनीही शुभेच्छा दिल्या आहेत. आयोजित केलेला चॅम्पियन ट्रॉफी यशस्वी करण्यासाठी प्रशिक्षणासाठी गेलेले धर्माबाद नगर परिषदेचे मुख्याधिकारी सतीश पुदाके यांचे सुद्धा मोलाचे मार्गदर्शन या टीमला होते धर्माबाद नगरपालिकेचे कार्यालयीन अधीक्षक रुखमाजी भोगावार, दत्तू गुर्जलवाड ,अशोक घाटे यांनी सुद्धा मोलाचे सहकार्य केले.

महात्मा बसवेश्वर महाविद्यालयात

क्रांतिसिंह सेवालाल महाराज यांची जयंती उत्साहात संपन्न

लातूर ।प्रतिनिधी

महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, जयंती उत्सव समिती आणि आस्थापना विभाग, महात्मा बसवेश्वर महाविद्यालय, लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने भारतीय समाज सुधारक क्रांतिसिंह सेवालाल महाराज यांची जयंती महाविद्यालयातील प्राचार्य कक्षात उत्साहात साजरी करण्यात आली.

या कार्यक्रमात अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ संजय गवई, उपप्राचार्य डॉ. राजकुमार लखादिवे, उपप्राचार्य प्रा. संजय पवार आणि कार्यालय प्रमुख नामदेव बेंदरगे उपस्थित होते.सर्वप्रथम भारतीय समाज सुधारक क्रांतिसिंह सेवालाल महाराज यांच्या प्रतिमेला सर्वांच्या उपस्थितीत पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले.

यावेळी प्रभारी प्राचार्य डॉ संजय गवई, उपप्राचार्य डॉ. राजकुमार लखादिवे, उपप्राचार्य प्रा. संजय पवार, कार्यालय नामदेव बेंदरगे यांनी मनोगते व्यक्त केले.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रत्नेश्वर स्वामी यांनी केले तर आभार विरसेन उटगे यांनी केले.या कार्यक्रमाला यशपाल ढोरमारे, विनायक लोमटे, महादेव स्वामी, श्रीशैल्य पाटील, योगीराज माकने, महाविद्यालयातील शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थी आदी उपस्थित होते.

नमुना इ -४

(नियम १८ पहा)

निवडणूक निर्णय अधिकारी :- श्रीमती एस.एस.कदम — **पदनाम :- सहायक निबंधक सहकारी संस्था ता.गेवराई जि.बीड**

सहकारी संस्थेचे नाव:- गेवराई तालुका सहकारी खरेदी विक्री संघ म.गेवराई ता. गेवराई जि.बीड — **अंतिम मतदार यादी प्रसिध्दी दिनांक- ०५ /०२/२०२४**

महाराष्ट्र सहकारी संस्था (समितीचो निवडणूक) नियम २०१४ व सुधारीत नियम २०१७ मधील नियम १८ प्रमाणे अधिकाराचा वापर करुन आणि मा.राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य,पुणे व मा.जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी यांनी जाहीर केलेल्या उपरोक्त सहकारी संस्थेच्या सदस्यांच्या निवडीकरीता मी , **श्रीमती एस.एस.कदम , सहायक निबंधक सहकारी संस्था ता.गेवराई जि.बीड** आणि मा.जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी बीड व मा.राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण यांच्या मान्यतेने **गेवराई तालुका सहकारी खरेदी विक्री संघ म.गेवराई ता. गेवराई जि.बीड** यांच्या समितीच्या सदस्यांची सन २०२४-२०२९ या कालावधीची निवडणूक घेण्याकरीता नियुक्त केलेला निवडणूक निर्णय अधिकारी याव्दारे **गेवराई तालुका सहकारी खरेदी विक्री संघ म.गेवराई ता. गेवराई जि.बीड** म्हणून ओळखल्या जाणा-या सहकारी संस्थेच्या समितीच्या सदस्यांची निवड करण्याच्या निवडणूकीच्या कार्यक्रमातील विविध टप्पे तयार करुन **दि. १६/०२/२०२४** पासून जाहीर करीत आहोत आणि या सोबत जोडलेल्या अनुसूचिच्या स्तंभ-२ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या मतदार संघाच्या किंवा मतदार संघाच्या संबंधातील निवडणूक नियत करीत आहोत.

अनुसुचि

अ. क्र.	मतदार संघाचे नाव		नामनिर्देशन पत्रे दाखल करण्यासाठी शेवटचा दिनांक (ज्या जागी नामनिर्देशनपत्रे मिळतील ती जागा)	मिळालेल्या नामनिर्देशन पत्राच्या यादीच्या प्रसिध्दीचा दिनांक	नामनिर्देशन पत्राच्या छाननीचा दिनांक व वेळ	छाननीनंतरच वैध नामनिर्देशन पत्राच्या यादीचा प्रसिध्दीचा दिनांक	ज्या दिनांकापर्यंत उमेदवारी मागे घेता येईल तो दिनांक व वेळ	निवडणूक लढविणा-या उमेदवारांच्या अंतिम यादीची प्रसिध्दी व चिन्हाचे वाटप दिनांक व वेळ	आवश्यक असल्यास ज्या दिनांकास ज्या वेळी व ज्या ठिकाणी मतदान घेण्यात येईल तो दिनांक ती वेळ व ते ठिकाण	मतमोजणी दिनांक, वेळ व स्थळ	मतदानाचे निकाल जाहीर करण्याचा दिनांक व वेळ
१	२		३	४	५	६	७	८	९	१०	११
१	संस्था प्रतीनिधी मधुन स मिती सदस्य	१०	दि.१६/०२/२०२४ ते दि.२३/०२/२०२४ सकाळी ११.०० ते दुपारी ३.०० वाजेपर्यंत (निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालयात)	दि.१६/०२/२०२४ ते दि.२३/०२/२०२४ जसे अर्ज प्राप्त होतील त्या प्रमाणे रोज दुपारी ५.०० वाजता (निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालयात)	दिनांक २६/०२/२०२४ दुपारी १२.०० पासुन छाननी संपेपर्यंत (निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालयात)	दिनांक २७/०२/२०२४ दुपारी १२.०० वाजता (निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालयात)	दि. २७/०२/२०२४ ते दि.१२/०३/२०२४ सकाळी ११.०० वा. ते दुपारी ३.०० वा. पर्यंत (निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालयात)	दिनांक. १३/०३/२०२४ सकाळी ११.३० वा. (निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालयात)	दिनांक. २४/०३/२४ वेळ सकाळी ०८.०० ते दुपारी ०४.०० वा. पर्यंत स्थळ- जि.प. मुलींची शाळा गेवराई ता.गेवराई , जि.बीड	दिनांक. २४/०३/२४ वेळ - दुपारी ४.३० स्थळ- स्थळ- जि.प. मुलींची शाळा गेवराई ता.गेवराई , जि.बीड	दिनांक २४/०३/२४ रोजी मतमोजणी नंतर लगेचच स्थळ- जि.प. मुलींची शाळा गेवराई ता.गेवराई , जि.बीड
२	अनुसूचित जाती / जमाती प्रतिनीधी	०१									
३	महिला प्रतिनीधी	०२									
४	इतर मागासवर्गीय प्रतिनीधी	०१									
५	भटक्या विमुक्त जाती / जमाती/ विशेष मागास प्रवर्ग	०१									
६	वैयक्तिक सभासदामधुन स मितीसदस्य	०२									
	एकूण	१७									

वरील अनुसुचिमधील क्र.०३ ते ०८ मधील कामकाज निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या कार्यालयामध्ये होईल. निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या कार्यालयाचा पत्ता कार्यालय, सहायक निबंधक, सहकारी संस्था ता.गेवराई , जि.बीड, छत्रपती संभाजी राजे व्यापारी संकुल, पाहिला मजला , बॅक ऑफ इंडीया व आय.सी.आय.सी.आय बँकेच्या शेजारी, मोंढा नाका, बीड रोड गेवराई ता.गेवराई जि.बीड असा आहे. निवडणूकी संबंधीत सर्व परीपत्रके, नियम व अनुषंगीक सुचना निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालयात पहावयास मिळतील. वरील अनुसुचिमधील क्र.०३, क्र.०४ व क्र.०७ मधील कामकाज शासकिय सुटीचे दिवस वगळुन होईल.

(एस.एस.कदम)
निवडणूक निर्णय अधिकारी
गेवराई तालुका सहकारी खरेदी विक्री संघ म.गेवराई ता. गेवराई जि.बीड

(समृत जाधव)
जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी
तथा जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था बीड

(अशोक गाडे)
सचिव
राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण,महाराष्ट्र राज्य पुणे

दैनिक • महाराष्ट्राचा बुलंद आवाज | बीड | छत्रपती संभाजीनगर | जालना | लातूर | परभणी | धाराशिव | हिंगोली | नांदेड | नगर

मराठवाडा पत्र

संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे

बीड जिल्हा

बीड (महाराष्ट्र)
BEED (MAHARASHTRA)

FRIDAY DT.16 FEBRUARY 2024
शुक्रवार,दि.१६ फेब्रुवारी २०२४

गेवराईत आज शिवजन्मोत्सवानिमित्त शाहीर संतोष साळुंके प्रस्तुत शिवकालीन पोवाडा कार्यक्रमाचे आयोजन

सर्व शिवभक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहा – राजेंद्र मोटे, महेश बेदरे

गेवराई (प्रतिनिधी) किसान अर्बन को. ऑप. क्रेडिट सोसायटी, झुंजार बचत गट व सकळ मराठा समाज गेवराई तालुका यांच्या संयुक्त विद्यमाने स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या शिवजन्मोत्सव सोहळ्यानिमित्त गेवराई शहरात प्रथमच ऐतिहासिक शिवकालीन पोवाड्याच्या कार्यक्रमाचे आयोजन केले असून या कार्यक्रमासाठी शहरासह तालुक्यातील सर्व शिवभक्तांनी सह कुटुंब सहपरिवार मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन गेवराई चे सर्व शिवभक्त च्या वतीने आयोजक तथा मनसे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मोटे व काँग्रेसचे तालुकाध्यक्ष कृषिभूषण महेश बेदरे यांनी केले आहे.

शिवजयंती घराघरात शिवछत्रपतींचे विचार मना मनात हे ब्रीद घेऊन सार्वजनिक शिवजन्मोत्सवानिमित्त गेवराईत प्रथमच झी टॉकीज फेम शिवशाहीर संतोष साळुंखे यांचा शिवछत्रपतींच्या जीवनावर आधारित हा शिवकालीन पोवाडा कार्यक्रम आज दि. १६ फेब्रुवारी शुक्रवार रोजी सायंकाळी ६:३० वाजता शास्त्री चौक गेवराई येथे आयोजित केला आहे. या कार्यक्रमासाठी शहरासह तालुक्यातील सर्व शिवभक्तांनी सह कुटुंब सहपरिवार मोठ्या संख्येने उपस्थित रहाव

माजलगाव सांस्कृतिक दृष्ट्या पुढारलेले शहर म्हणून ओळखल्या जावं– जगताप

माजलगाव (प्रतिनिधी)

माजलगाव शहराची ओळख सांस्कृतीक दृष्ट्या पुढारलेल शहर म्हणून नावारूपास येण्यासाठी इथल्या विद्यार्थ्यां मधील सुप्त गुणांना वाव मिळायला हवा याकरिता त्यांना योग्य व्यासपीठ व संधी मिळवून देणार असल्याचे प्रतिपादन भाजपा माजलगाव विधानसभा निवडणूक प्रमुख मोहनराव जगताप यांनी नमो चषक २०२४ च्या बक्षीस वितरण प्रसंगी केले.

आज भाजप मध्यवर्ती कार्यालयात नमो चषक अंतर्गत घेण्यात आलेल्या विविध स्पर्धा मधील विजेत्यांना मोहनराव जगताप यांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी भाजपचे माजी शहराध्यक्ष जगदीश टवानी होते.तसेच भाजप प्रदेश सदस्य प्रशांत पाटील, भाजप महिला आघाडी तालुकाध्यक्ष गौरीताई देशमुख,पांडुरंग सोळंके, बाजार समिती संचालक भगवानराव आगे,संतोषराव यादव,उद्धवराव नागरगोजे,भाजप विस्तारक रमेश शेंडगे,सुरेशराव एरंडे, बबनराव सिरसट,नानासाहेब घोडके,भटके विमुक्त आघाडीचे जिल्हा उपाध्यक्ष वसंतराव आलकुंटे,भाजप जैष्ठ नेत्या छाया ताई कोकीळ,गंगामसला सरपंच भालचंद्र सोळंके,अविनाश गोंडे,नगरसेवक विनायक रत्नपारखी, सोशल मीडिया प्रदेश सदस्य दत्ता महाजन,पवन मोगरेकर,भाजप युवा नेते मुश्ताक मोमीन यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी प्रमूख मान्यवरांनी मनोगत व्यक्त केले . पुढे बोलताना मोहन जगताप यांनी सांस्कृतीक व क्रीडा स्पर्धांची तरुण मुलांना किती गरज आहे यावर पालकांनी लक्ष देऊन आपल्या पाल्यामधील सुप्त कला गुणांना वाव मिळण्यासाठी त्याला अश्या स्पर्धा मधे सहभागी होऊ द्यावं. माजलगाव शहराची ओळख सांस्कृतीक दृष्ट्या पुढारलेले शहर व्हावी अशीही इच्छा असल्याचं त्यांनी मनोगतात सांगितलं.या प्रसंगी प्रभाकर खेत्री, माजी सरपंच प्रल्हादराव दळवी, अंकुशराव भोसले,बिबिषणराव बडे,राजेश जाधव,चांद भाई,शेख अब्बास,महादेव आगे,सगीर भाई देशमुख,ताज खान पठाण,सुभाषराव कांबळे,रवींद्र शिंदे,अमोल राऊत,नामदेव मुळे,रवी गायकवाड यांच्यासह शहरातील क्रीडा प्रेमी नागरिकांची उपस्थिती होती. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सरपंच मारुती विटेकर यांनी प्रस्ताविक.

प्रहार शिक्षक संघटनेच्या राज्य उपाध्यक्षपदी अविनाश तांदळे यांची निवड

निवडीबद्दल सर्वत्र स्वागत

मुंबई (प्रतिनिधी)

प्रहार शिक्षक संघटनेचे संस्थापक अध्यक्ष तथा प्रमुख मार्गदर्शक मा.ना. श्री.ओमप्रकाश उर्फ बच्चूभाऊ कडू अध्यक्ष दिव्यांग कल्याण मंत्रालय महाराष्ट्र राज्य , मुंबई यांच्या आदेशानुसार तसेच मा.श्री.राहुलजी मोहोड राज्य संपर्क प्रमुख तथा स्वीय सहाय्यक मा.ना.श्री.दिपकजी केसरकर शालेय शिक्षण व क्रिडा विभाग महाराष्ट्र राज्य यांच्या मार्गदर्शनाखाली श्री.अविनाश कारभारी तांदळे यांची शैक्षणिक व सामाजिक कार्याची दखल घेऊन मुंबई येथे प्रहार शिक्षक संघटनेच्या महाराष्ट्र राज्याच्या उपाध्यक्षपदी श्री.विकास घुगे राज्यअध्यक्ष , प्रहार शिक्षक संघटना महाराष्ट्र राज्य यांनी नियुक्ती केली आहे.

नुतन राज्य उपाध्यक्ष श्री.अविनाश तांदळे यांनी यापुर्वी विविध पदावर काम करत एक अत्यंत अभ्यासु लिडर , मनमिळावू लढावु नेतृत्व , जिद्दी व धाडसी निर्णय घेणारे असे नेतृत्व म्हणुन ते ओळखले जातात. त्यांनी आजवर अधिकारी / कर्मचारी यांच्या विविध परिषदा तसेच सामाजिक , शैक्षणिक , सांस्कृतिक कार्यात नेहमी अग्रेसर असलेले नेतृत्व म्हणुन ते जनमाणसात ओळखले जातात. जिल्हा परिषदेमध्ये त्यांनी त्यांच्या कार्यकाळात शिक्षकांच्या विविध प्रश्नांची सोडवणुक केली. महाराष्ट्र राज्यात उत्तम सामाजिक कार्य असणारे जनमानसात उत्तम नावलौकिक असणारे शिक्षकांच्या अडीअडचणी , मागण्या , अन्यायाचे निराकरण , पदोन्नती , बदल्या , निलंबन , कारवाया मागे घेणे , भ्रष्टाचार , सेवासातत्य , उपोषणे , धरणे आंदोलन व इतर अनेक गोष्टी त्यांच्या नेतृत्वाखाली झाल्या. तसेच हजारो शिक्षकांना जोडण्याचे महत्तवपुर्ण योगदान विचारात घेत त्यांच्याकडे राज्य उपाध्यक्ष पदाची धुरा सोपवली आहे. सदर निवडीबद्दल राज्य संपर्क प्रमुख श्री.राहुल मोहोड , राज्य सरचिटणीस श्री.वैजनाथ सावंत , राज्य कार्याध्यक्ष श्री.दत्ताञय पुरी , राज्य सरचिटणीस (म.न.पा) श्री.कृष्णा बोदेले , राज्य कोषाध्यक्ष श्री.अश्विन सेमस्कर , राज्य सहसचिव श्री.योगेश भोई तसेच विविध पदाधिकारी यांनी त्यांचे अभिनंदन केले

साखरबाई कांबळे यांना

त्यागमुर्ती माता रमाई पुरस्कार प्रदान !

बीड :– बीड येथील पंचशील नगर भागात राहणाऱ्या साखरबाई कांबळे यांना त्यागमुर्ती माता रमाई पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले आहे. साखरबाई कांबळे यांच्या संपूर्ण कुटुंबाने तथागत गौतम बुध्दांच्या धम्मकार्यात स्वतहाला वाहून घेतलेले आहे. यामध्ये साखराबाई कांबळे या सातत्याने धम्म कार्य असो, सामाजिक कार्य असो वा अंधश्रद्धा निर्मुलन असो त्या या सर्व कार्यासाठी तत्पर असतात.महिलांना त्यांचा हक्क आणी न्याय मिळवण्यासाठी साखरबाई कांबळे या कायम महिलांना मार्गदर्शन करत असतात. आपण स्वतहा शिक्षीत होऊन आपल्या मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात आणुन आपल्या पिढयान् पिढयाचा उध्दार कसा होतो याचे स्त्रियांना वैचारिक शिक्षण व मदत कार्य साखराबाई कांबळे करत असतात. साखराबाई कांबळेच्या या महान आणी सामाजिक कार्याची दखल त्यागमुर्ती माता रमाई या पुरस्कारासाठी त्यांची निवड करण्यात येऊन त्यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे. साखराबाई कांबळे यांना त्यागमुर्ती माता रमाई हा पुरस्कार मिळाल्यामुळे महिला वर्गाने आनंद साजरा केला असून योग्य व्यक्तीच्या कार्यकर्तूत्वाचा सन्मान केला अशा भावना महिलांनी व्यक्त केल्या आहेत.

१६ तारखेला श्री स्वामी नरेंद्राचार्यजी महाराजांचा

सिद्ध पादुका दर्शन सोहळा पाटोदा शहरामध्ये

अनंत श्री विभूषित जगद्गुरु रामानंदाचार्य श्री स्वामी नरेंद्राचार्यजी महाराज, दक्षिण पीठ, नाणीज धाम (महाराष्ट्र) यांचा सिद्ध पादुका दर्शन सोहळा १६ तारखेला शुक्रवार रोजी पाटोदा शहरांमध्ये संपन्न होत आहे. तरी बीड जिल्ह्यातील व पाटोदा तालुक्यातील भाविकांनी याचा लाभ व गुरुमाऊलींचे आशीर्वाद घ्यावेत आणि सर्वांनी कार्यक्रमाला यावे असे जगद्गुरु नरेंद्राचार्यजी महाराज भक्त सेवा मंडळ, बीड यांच्या वतीने आव्हान करण्यात येत आहे.

अनंत श्री विभूषित जगद्गुरु रामानंदाचार्य श्री स्वामी नरेंद्राचार्यजी महाराज यांचा प्रथमच आपल्या पाटोदा शहरामध्ये पादुका दर्शन सोहळा आयोजित केलेला आहे बीड जिल्ह्यातून वीस ते पंचवीस हजार भक्तगण येतील असा अंदाज आहे हा कार्यक्रम १६ तारखेला दिवसभर भक्तिमय वातावरणात चालणार आहे आणि याचा लाभ जिल्ह्यातील भाविकांना घेता येणार आहे. या संस्थांच्या माध्यमातून अनेक समाज उपयोगी कार्य केले जाते मोफत राष्ट्रीय महामार्गावर ऍम्ब्युलन्स सेवा, गरजू पेशंटला मोफत रक्तदान, गोरगरिबांच्या मुलांसाठी मोफत इंग्रजी माध्यमाचे शिक्षण, मोफत ड्राइविंग स्कूल, गोरगरिबांना धान्य वाटप, व्यसनमुक्ती असे अनेक बरेचसे उपक्रम या संस्थांनमार्फत मोफत केले जातात अशा जगद्गुरु श्रींचा सिद्ध पादुका दर्शन सोहळा आपल्या पाटोदा शहरांमध्ये होत आहे याचा लाभ सर्व जिल्ह्यातील भक्तगणांनी घ्यावा ही सर्वांना विनंती आहे. या कार्यक्रमानिमित्त पाटोदा शहरांमधून श्रींच्या सिद्ध पादुकांची भव्य शोभायात्रा निघणार आहे, कार्यक्रम स्थळी मान्यवरांच्या हस्ते सामाजिक उपक्रमाचे वितरण होणार आहे, गुरुपूजन होणार आहे, प्रवचन होणार आहे, भक्त दीक्षा होणार आहेत व महाप्रसादाहोऊन नंतर पुष्प व्रष्टी होऊन कार्यक्रमाची सांगता होणार आहे. तरी या कार्यक्रमासाठी जिल्ह्यातील असंख्य भाविकांनी याचा लाभ घ्यावा असे आवाहन जगद्गुरु नरेंद्राचार्यजी महाराज भक्त सेवा मंडळ, बीड जिल्हा, आयोजित. यांच्यावतीने करण्यात आले आहे.

पाटोदा ग्रामीण रुग्णालयात खोकल्याचे औषध नसल्याची तक्रार करताच

खोकल्याला औषधांची गरज नाही! जिल्हाशल्यचिकित्सक डॉ अशोक बडे यांचा जावई शोध

पाटोदा (प्रतिनिधी)

पाटोदा ग्रामीण रुग्णालयात अनेक समस्या असुन जिल्हाशल्यचिकित्सक अधिकारी यांनाच ऐकून घ्यायला वेळ नाही तर पाटोदा ग्रामीण रुग्णालयातील समस्या कोणा पुढे मांडाव्यात या बाबत सविस्तर वृत्त असे की, राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत दुर्गम भागातील रुग्णांना मोफत वैद्यकीय व दंत महाआरोग्य शिबीराची माहिती देण्यासाठी आज मंगळवार दिनांक १३ फेब्रुवारी रोजी पाटोदा ग्रामीण रुग्णालय येथे जिल्हा शल्यचिकित्सक डॉ बडे आले असता, पाटोद्यातील नागरिक व पत्रकार बांधवानी पाटोद्यात वाढलेल्या अपघाताची संख्या पाहून पाटोदा ग्रामीण रुग्णालयात ट्रामासेंटर सुरू करावे अशी मागणी केली असता हे आमचे काम नसुन तुमचे लोकप्रतिनिधी काय करतात!? असे उर्मठ उत्तर दिले. एवढ च्यावर च जिल्हाशल्यचिकित्सक डॉ अशोक बडे थांबले नसुन ग्रामीण रुग्णालयातील गोळ्या औषधे तुटवड्या बाबत विचारना केली असता डॉ.अशोक बडे यांनी जावई शोध लावला. खोकला आल्यावर औषध बाटली कशाला लागते? असे उत्तर दिले. यामुळे एक जबाबदार अधिकारी जर एवढ्या ठाम पणे सांगत असेल तर महाराष्ट्र सरकार आरोग्य विभाग खोकल्याचे औषध असलेल्या कफ सिरफ वर कोट्यवधी रुपये खर्च का करते? असा मोठा प्रश्न उपस्थित झाला आहे. डॉ अशोक बडे यांचे विधान ऐकुन शासन सामान्य नागरिकांची फसवणूक तर करत नाही ना? असाच प्रश्न उपस्थित होतो. महाराष्ट्र सरकारने बीड जिल्ह्यातील आरोग्य विभागाचे जबाबदार अधिकारी असे उत्तर देत असतील तर यांची नक्कीच चौकशी केली पाहिजे खोकल्याला औषधांची गरज नाही तर दुसरा कोणता उपाय आहे? यावर अभ्यास करण्यासाठी एक समिती नेमून त्या समितीचे प्रमुख डॉ बडे यांना करुन शासनाचे करोडो रुपयांची होणारी लूट थांबवावी अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते गणेश शेवाळे यांनी केली आहे.

पाटोदयात ट्रामासेंटर सुरू करा मागणी करताच सि.एस बडे संतापले, तुमच्या लोकप्रतिनिधीना सांगा ?

२३ व्या दिवशी प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी हमालांचे अर्धनग्न आंदोलन

बीड ।प्रतिनिधी

धरणे आंदोलनास २३ दिवस झाल्यानंतर ही अतिश्य सामान्य व दिर्घकाळापासून प्रलंबीत मागण्यासाठी गेले २३ दिवसापासून बेमुदत धरणे आंदोलन जिल्हाधिकारी कार्यालयासमोर चालु आहे. याकडे लक्ष वेधण्यासाठी गुरुवार १५ फेब्रुवारी रोजी दुपारी १२ ते ३ अर्धनग्न आंदोलन करण्यात येणार आले.

गेल्या तेवीस दिवसात आक्टो,नोव्हे,डिसें,जानेवारी पैकी केवळ दोन महीन्याची मजूरी पाठवली आनंदाचा शिधाकिटचे हमाली बिल केवळ १ महिण्याचे बनवले पुर्वी पाठवलेल्या दोन बिलाच्या त्रुटी पुर्तता करण्यात आली तर दोन किटचे बिल बनवलेच नाही व आनंदाचा शिधा किटची हमाली एक वर्षापासून हमाली मिळाली नाही महागाई निर्देशांकाबाबत गेली अनेक वर्षापासूनच्या मागणीसाठी वेळोवेळी आंदोलने केली.अखेर कंटाळून औरंगाबाद हायकोर्टत रिट याचीका दाखल केली मा.उच्चन्यायानयाने १ ऑगष्ट रोजी सहा आठवडयात महागाई निर्देशांकाने फरक देण्याचे आदेश दिले.यालाही सहा महिन्याचा कालावधी लोटला. दरम्यानच्या सहा महिन्यात आम्ही वेळोवेळी निवेदने व धरणे आंदोलन केले. मात्र ह्याकडे कोणी ढुंकूनही पाहीले नाही.

तर थेट वाहतूक व द्वारपोहोच धोरण स्विकारल्या नंतर शासनाच्या १५.१.२०२१ च्या शासन निर्णयातील कलम १३.११ कडे संपुर्ण दुर्लक्ष करुन केवळ १३.१० अन्वये हमालांचा रोजगार काढुन घेण्याचा प्रयत्न प्रशासनाने केला. ही बाब अतिशय चुकीची वाटते. हा प्रश्न केवळ बीड जिल्हयाचा नाही तर राज्याचा आहे. ह्याची आम्ही राज्य स्तरावर ज्यावेळी चर्चा केली त्यावेळी मुंबईतील एक संघटनेने याबाबत शासनाने जिल्हापुरवठा अधिकारी यांना जे रोजगार वाचवण्याचे पत्र दिले त्याची माहिती देवून पत्राची प्रत दिली. ती मी तातडीने माथाडी मंडळ व जिल्हापुरवठा अधिकारी यांना दिली. मात्र त्यानूसार कोणतीही कार्यवाही जिल्हापुरवठा कार्यालयाने व माथाडी मंडळाने केली नाही.

वाहतूक कंत्राटदाराकडे जिल्हातील गोदाम हमालांनी माहे नोव्हेंबर, डिसेंबरचे थेटवाहतूक व द्वारपोहोच चे काम केले. त्यातील द्वारपोहोच मजूरी कंत्राटदाराने नगदी स्वरुपात हमालांना दिली व थेट वाहतूकीच्या कामा मध्ये जेथे मोठा ट्रक जात नाही. तेथे मोठया गोडीतून छोटया गाडयामध्ये क्रॉसींगचे काम त्यातील फक्त क्रॉसींगचे पैसे कंत्राटदाराने दिले. मात्र ट्रक मध्ये मालाचे वजन करणे वजन झाल्यानंतर स्वस्त धान्यदुकाना पर्यंत वाहनी करणे तेथे दुकानात उतरवून त्याची दुकानात थप्पी लावून देणे ह्या कामाची तसेच गेवराई व माजलगाव येथे थेट वहातूकीची व धान्याचे ५० किलो प्रमाणे प्रमाणिकरण केले.त्याची मजूरी कामगारांना मिळाली नाही. त्याची मजूरी कामगारांनी व संघटनेने जिल्हा प्रशासनाकडे व माथाडी मंडळाकडे मागीतली त्याबाबत जिल्हा प्रशासनाने माथाडी मंडळास काहीही कळवले नाही.

बीड मध्ये मी रमाई बोलते एकपात्री नाट्यप्रयोग

मोठ्या संख्येने उपस्थित राहा; माता रमाई आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समितीच्या वतीने आवाहन

बीड ।प्रतिनिधी

माता रमाई भीमराव आंबेडकर यांची १२६ वी जयंती निमित्त बीड मध्ये मी रमाई बोलते एकपात्री नाट्यप्रयोगाचे आयोजन माता रमाई आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समिती बीड यांच्या वतीने दि.१८ फेब्रुवारी रोजी सायं ६ वाजता बीड येथील यशवंतराव चव्हाण नाट्यगृह येथे करण्यात आले आहे. या कार्यक्रमास बीड शहरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन संयोजन समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

बीड शहरामध्ये माता रमाई आंबेडकर यांची जयंती मोठ्या आनंदोत्सवात साजरी करीत आहोत. सामाजिक क्रांतीच्या लढाईची स्फुर्ती प्रेरणा म्हणजे माता रमाई. मानव मुक्तीच्या लढ्याची जननी म्हणजे माता रमाई. प्रचंड कष्ट, त्याग आणि सहनशीलपणे केलेल्या संघर्षाचे नाव म्हणजेच माता रमाई. दि. ७ फेब्रुवारी हा माता रमाई आंबेडकर यांचा जन्मोत्सवाचा दिवस. त्या निमित्ताने दि. १८ फेब्रुवारी रोजी मी रमाई बोलते एकपात्री प्रयोगाचे सादरीकरण आयु.मा. प्रियंका उबाळे (चित्रपट अभिनेत्री, मी रमाई बोलते) या कार्यक्रमातून करणार आहेत.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रा.डॉ. प्रेमचंद सिरसट (सौ.के.एस. के. महाविद्यालय, बीड),प्रमुख अतिथी रविंद्र शिंदे (सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण विभाग, बीड) हे असून प्रमुख उपस्थिती डॉ. सोनल घनघाव(माऊली हॉस्पिटल, बीड),प्रा. डॉ. राणी जाधव (जयभवानी महाविद्यालय, गढी ता. गेवराई) यांची असणार आहे. तरी या कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित राहा असे आवाहन प्राचार्य सुशिलकुमार गायकवाड, प्रा. विनोद किर्दक, प्रा. डॉ. संजय सावते,प्रा.राम गायकवाड,प्रा. डॉ. उत्तम साळवे, प्रा.डॉ. दत्ता तंगलवाड, इंजि. वसंत तरकसे, मा. चौरंगनाथ ढोकणे, मा. सुर्यकांत कोकाटे, मा. शरद मगर यांनी केले आहे.

हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि.बीड, –४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता.जि.बीड –४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक – दत्तात्रय सखाराम नरनाळे,

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed, Beed -431122 (Maharashtra).
Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq-Beed Dist-Beed pin -431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail-dailymarathwadapatra2021@gmail.com,
epaper : https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com